# मीनाची दुनिया - रेडिओ कार्यक्रम

## शिक्षक मार्गदर्शिका

(इयत्ता ५वी, ६वी आणि ७वी करिता)



# प्रस्तावना

रेडिओ एक लोकप्रिय आणि कमी खर्चीक माध्यम आहे, ज्याच्या साह्याने शाळेत मुलांना मनोरंजक पद्धतीने शिक्षण दिले जाऊ शकते. 'मीनाची दुनिया' हा रेडिओ कार्यक्रम विशेषतः उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आला आहे. हा कार्यक्रम युनिसेफच्या साह्याने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद व महाराष्ट्र शासन यांच्या द्वारे विकसित करण्यात आला आहे.

बाल-अधिकारांविषयी जागरुकता वाढावी, तसेच मुली व मुले यांच्यात समता निर्माण व्हावी या उद्देशाने युनिसेफ द्वारे 'मीना' चा पहिला भाग १९९० मध्ये विकसित करण्यात आला. मीनाची प्रत्येक गोष्ट मनोरंजक आणि रोचक असण्याबरोबरच बाल-अधिकार, लिंगभाव, समानता तसेच बालमित्र शाळा यांवर आधारित मुद्दयांचाही त्यात समावेश करण्यात आला आहे.


'मीनाची दुनिया' या रेडिओ कार्यक्रमातील प्रत्येक उपकथा १५ मिनिटांची आहे. तसेच ही एकूण १२० भागांची मालिका आहे. या कार्यक्रमाचे प्रसारण 'ऑल इंडिया रेडिओ' वरुन प्रत्येक सोमवार ते शनिवार (सुट्टी वगळून) या दिवशी केले जात आहे.

'मीनाची दुनिया' हा रेडिओ कार्यक्रम यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे. देशाच्या भावी नागरिकांना आपले अधिकार आणि कर्तव्य यांची सकारात्मक जाणीव होईल.

हा कार्यक्रम अधिक चांगला व्हावा यासाठी आपण जरुर सूचना कराव्यात.

# अनुक्रम


| क्रमांक | अनुभाग | विषय | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|---|
| | | **प्रस्तावना** | |
| **१** | **प्रथम भाग** | **परिचय** | |
| | | • शिक्षकांसाठी मार्गदर्शिका आणि त्याचा वापर | ५ |
| | | • मीनाच्या संवादाची सुरुवात | ८ |
| | | • 'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रम आणि त्याचे उद्देश | १० |
| **२** | **द्वितीय भाग** | **'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रम प्रसारण** | |
| | | • कार्यक्रमाची रुपरेखा | ११ |
| | | • रेडिओ प्रसारणापूर्वी, दरम्यान आणि नंतर काय करायला पाहिजे | १२ |
| | | • शिक्षकांसाठी सूचना | २१ |
| **३** | **तृतीय भाग** | **कार्यवाही** | |
| | | • पूर्वावलोकन आणि पुनरावृत्तीसाठी विविध उपक्रम | २३ |
| | | • मुले | २३ |
| | | • पालक आणि समाज | २५ |
| **४** | **चतुर्थ भाग** | **शिक्षणाद्वारे विकसित करण्यात येणारी आवश्यक जीवन कौशल्ये** | २८ |
| **५** | **विविध उपक्रम** | **सामाजिक जागरुकता** | ३० |

# परिचय

## शिक्षकांसाठी मार्गदर्शिका

आपणांसारख्या शिक्षकांना 'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रमाबाबत माहिती देण्यासाठी ही मार्गदर्शिका तयार करण्यात आली आहे. आपल्याला शिकण्याची प्रक्रिया चर्चा आणि कृती कार्यक्रमाद्वारे पुढे न्यायची आहे. त्यामुळे 'मीनाची दुनिया' कार्यक्रमातून मिळालेले संदेश मुलांच्या लक्षात राहतील आणि ते संदेश मुले आपल्या कुटुंब व मित्रमंडळींपर्यंत पोहचवतील.

या कार्यक्रमाद्वारे पालक आणि समाजातील सदस्य यांना मुलांबाबत, खासकरून मुलींबाबत विचार आणि व्यवहारात बदलाची प्रेरणा दिली जाऊ शकते.

## शिक्षकांसाठी मार्गदर्शिका उपयोगात आणण्याची पद्धत

'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रमाच्या प्रसारणापूर्वी, प्रसारणादरम्यान आणि प्रसारणानंतर आपली भूमिका आणि जबाबदारी समजावण्यास ही मार्गदर्शिका मदत करते.

'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रमाच्या प्रसारणामध्ये मांडण्यात आलेल्या विविध मुद्दयांवर विचार-विनिमय आणि विविध उपक्रम सुरु करण्यास मदत मिळते.

एक शिक्षक म्हणून, या कार्यक्रमाचा सारांश आणि देण्यात आलेली उदाहरणे यांच्याशी परिचित होऊन, रेडिओ कार्यक्रम प्रसारणासाठी स्वतःला सुसज्ज करावे. उदाहरणार्थः मुलांना मीनाच्या गोष्टी कशा शिकवाल? कशा प्रकारचे प्रश्न विचाराल?

या माहितीच्या साठ्यात एक शिक्षक म्हणून आपण आपले अनुभव जोडून कार्यक्रम अधिक अनुकूल बनवू शकता.

## ‘मीन-राजू मंच’ पार्श्वभूमी



कोणत्याही राष्ट्राच्या विकासाकरीता तेथील शिक्षणाचा दर्जा आणि लोकांची क्षमता महत्त्वाची असते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात शिक्षणाच्या सार्वभौमिकरणासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले, तरी आजही भारताची एकूण साक्षरता ७४.०४ टक्के आहे, ज्यामध्ये महिला साक्षरता ६५.४६ टक्के आहे. याचे कारण, आजही मुलींच्या शिक्षणात अनेक अडथळे दिसून येतात. उदा.:-

- लिंग भेद
- रुढी-परंपरा
- बालविवाह
- घरकामांची जबाबदारी
- मुलांचा संकोची स्वभाव
- प्रोत्साहनाची उणीव
- असुरक्षिततेची भावना
- मोठे कुटुंब

यांसारख्या अडथळयांचे निवारण आणि मुलींचा शाळांमध्ये प्रवेश, तसेच त्यांची गळती थांबवण्यासाठी, जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत विविध जिल्ह्यांमध्ये मीना मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये मीनाच्या गोष्टींवर चर्चा घडवून आणली. पण लवकरच हे लक्षात

आले की, जर आपणांस मुलींच्या संपूर्ण सशक्तिकरणाचा विचार करायचा असेल तर आपल्याला लिंगभेद आणि समाजाचा मुलींबद्दल असलेला दृष्टिकोन बदलावा लागेल. याचसोबत हेही लक्षात आले की, या बाबतीत किशोरवयीन मुला-मुलींशीच सरळ संवाद साधणे जास्त परिणामकारक ठरेल. या उद्देशानेच उच्च प्राथमिक शाळांमध्ये 'मीना-राजू मंच' तयार करण्यात आले आहेत.

**'मीना-राजू मंच' संकल्पनाः** 'मीन-राजू मंच' हा उच्च प्राथमिक शाळेतील मुला-मुलींचा गट आहे. हा गट मुलींच्या शिक्षणाच्या मुद्दयाला पुढे नेण्यासाठी काम करेल. तसेच बालहक्कासंबंधी किशोरवयीन मुला-मुलींमध्ये जागृति निर्माण करेल. हा गट पुढील मुद्दयांना चालना देण्याचे काम करेल.



१ समता

२ मुला-मुलींची शाळेमध्ये नियमित उपस्थिती


३ किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य आणि स्वच्छता

४ शालेय स्वच्छता, आरोग्य शिक्षण आणि शुद्ध पिण्याचे पाणी

५ जीवन कौशल्य

## 'मीन-राजू मंच' ची रचनाः

प्रत्येक शाळेच्या 'मीन-राजू मंच' मध्ये ५वी ते ७वी मध्ये शिकणाऱ्या दहा मुली आणि दहा मुलांचा समावेश असेल. यामध्ये शाळेत वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल झालेल्या ३-४ मुला-मुलींचा समावेश करावा.



मीना-राजू मंचाच्या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, प्रवक्ता आणि दोन सदस्यांचा समावेश असेल.



## मीनाच्या संवादाची सुरुवात

इ.स.१९९० मध्ये मीनाच्या संवादाची सुरुवात युनिसेफ द्वारे करण्यात आली. याचा उद्देश, मुलांच्या अधिकारांची माहिती देणे आणि मुला-मुलींमध्ये होणारा भेदभाव नाहीसा करणे असा आहे.

## मीना कोण आहे ?

मीना ९ वर्षांची मुलगी आहे, ती आपले आई-वडील, आजी, भाऊ राजू आणि बहीण राणी यांच्या बरोबर एका गावात राहते.

मीना आनंदी व उत्साही मुलगी आहे. ती सदैव इतरांना मदत करण्यात तत्पर असते.

मिठू पोपट तिचा सर्वात प्रिय मित्र आहे. मिठू पोपट तिला प्रत्येक कामात मदत करतो.

मीना इतर सामान्य मुलींसारखीच, पण काही विशेष गुण असलेली मुलगी आहे. ती प्रश्न विचारायला घाबरत नाही, ती कमजोर लोकांची बाजू घेते, दुसऱ्यांच्या गरजांबद्दल ती संवेदनशील आहे, कुटुंबीय आणि मित्र-मैत्रिणींच्या आडचणी सोडवण्यात ती तत्पर असते.

मीना ही गोड मुलगी आहे. ती सर्वांना आवडते. ती जिथे जाते तिथे लोक तिचे मनापासून स्वागतच करतात.

मीना तुमच्या शाळेत येऊन, तुम्ही आणि तुमच्या शाळेतील मुला-मुलींसोबत राहण्यास उत्सुक आहे.



## 'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रम-

शाळेतील मुलांना मनोरंजनाबरोबरच माहिती आणि ज्ञान देण्यासाठी रेडिओ कमी खर्चाचे, लोकप्रिय आणि प्रभावी माध्यम आहे. 'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रमाची निर्मिती खास करुन शालेय मुला-मुलींसाठी करण्यात आली आहे.


युनिसेफ आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद व महाराष्ट्र शासन यांच्या द्वारे सदर कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

'मीनाची दुनिया' या कार्यक्रमाचा प्रत्येक भाग १५ मिनिटांचा आहे. त्याचे प्रसारण आकाशवाणीवरून सोमवार ते शनिवार शालेय वेळेत करण्यात येणार आहे.

शाळेत शिकणाऱ्या ५वी ते ७वी या वर्गातील ११ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांचा विचार करुन हा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. हाच वयोगट या कार्यक्रमाचा मुख्य श्रोतागट आहे.

अप्रत्यक्ष रूपाने हा कार्यक्रम, आपल्यासारखे शिक्षक, पालक, समाजातील सदस्य, शाळेचे संचालक, शिक्षण मित्र, समाजाचे नेतृत्व करणारे लोक, सरपंच, पंचायत सदस्य इत्यादींनाही प्रभावित करेल.





## 'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रमाचा उद्‌देशः



**मुलांना विशेषतः** मुलींना स्वतःचा आत्मसन्मान वाढविता यावा यासाठी 'मीनाची दुनिया' रेडिओ कार्यक्रम मदत करतो. अशी सक्षम मुले-मुली स्वतःबरोबर इतरांना मदत करतील.

उदाहरणार्थ मीना-राजू मंच चे सदस्य शाळाबाह्य मुलांना शाळेत येण्याबाबत प्रोत्साहन देतील.


कार्यक्रमांचे घटक ३ प्रमुख मुद्दयांवर लक्ष केंद्रित करतात - बालहक्क, मुलगा-मुलगी समता आणि बालकेंद्री शाळा.

**बालहक्कः-** प्रत्येक पाल्याचा हा मूलभूत अधिकार आहे की, त्याला प्रगती करता यावी व आपला संपूर्ण विकास करता यावा. उदाहरणार्थ जीवन, विकास आणि सुरक्षेचा अधिकार

**मुलगा-मुलगी समताः-** शिक्षण, आहार, पोषण, खेळणे आणि कामाच्या वाटणीत समानता असावी.

**बालकेंद्री शाळाः-** ज्यात मुलांचे स्वास्थ्य, आहार, पोषण आणि मानसिक स्वास्थ्य यावर पूर्ण लक्ष दिले जाऊ शकेल असे वातावरण शाळेत असावे. मीनाच्या गोष्टी अशा आहेत की, ज्या मुलांना समस्या सोडवण्याची प्रेरणा देतात, योग्य दिशेने योग्य विचाराने निर्णय घेण्याची क्षमता देतात. मीनाच्या गोष्टीतून मुलांना सुसंवाद आणि बोलण्याची कला, चांगल्या-वाईटाची जाण, भावना व तणावांवर नियंत्रण ठेवणे, विवाद सोडवणे या बाबी शिकता येतात.

*(अधिक माहितीसाठी संलग्न जीवन कौशल्याची मूलभूत माहिती वाचा)*



## द्वितीय भाग

### ‘मीनाची दुनिया’ चे प्रसारण

मीना रेडिओ कार्यक्रमाच्या प्रसारणापूर्वी, प्रसारणादरम्यान आणि प्रसारणानंतर शिक्षकांची काय जबाबदारी आहे याची मूलभूत माहिती या विभागात देण्यात आली आहे.

### ‘मीनाची दुनिया’ रेडिओ कार्यक्रमाची रूपरेखाः

‘मीनाची दुनिया’ रेडिओ कार्यक्रमाच्या प्रत्येक भागामध्ये ३ प्रमुख घटक आहेत, ज्यांना सूत्रधार, विवरण, समीक्षा, टिप्पणी याद्वारे जोडण्यात आले आहे.


- पहिला घटक आहे, मीनाची गोष्ट.
- दुसरा घटक आहे, सहजपणे गुणगुणता येईल असे गाणे.
- तिसरा घटक आहे, खेळ, कोडी, प्रश्नावली.

काही ठिकाणी गोष्टीत जो विषय मांडण्यात आला आहे तोच गाणे आणि खेळातही मांडण्यात आला आहे. म्हणजेच एकच संदेश तीनही घटकांमध्ये मांडण्यात आला आहे.

जर ‘मीनाची दुनिया’ रेडिओ कार्यक्रमासाठी ३५ मिनिटांची तासिका नियोजित केली असेल तर ती तासिका अशी विभाजित करता येईल.

- वर्ग आणि विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी ५ मिनिटे
- रेडिओ कार्यक्रम ऐकण्यासाठी १५ मिनिटे
- विद्यार्थ्यांबरोबर क्रिया-प्रतिक्रिया तसेच विचार विनिमय करण्यासाठी १५ मिनिटे





## कार्यक्रम प्रसारणापूर्वी काय केले पाहिजे? (५ मिनिटे)

ऐकण्याचा अर्थ केवळ शब्द कानावर पडणे नाही. मुलांमध्ये कार्यक्रम ऐकण्यासाठी सतर्कता आणि एकाग्रता असणे याची नितांत आवश्यकता आहे. म्हणजे कार्यक्रमात जे सांगितले जात आहे ते मुले समजू शकतील. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा वर्गाचे वातावरण पूरक असेल. शिक्षक म्हणून आपण योग्य वातावरण-निर्मिती साठी खालील गोष्टी करू शकता-

### १. वर्गाचे वातावरण आणि गरजा यांचे एकदा निरीक्षण करणे-

यासाठी विद्यार्थ्यांवरही विविध जबाबदाऱ्या सोपवता येतात.



- रेडिओ सेट योग्य जागी, सुरक्षित ठेवला जावा, रेडिओच्या दुरुस्तीवर लक्ष ठेवले जावे, गरज पडल्यास बॅटरी (सेल) सहज आणि लवकर उपलब्ध होईल अशी व्यवस्था ठेवणे.
- कार्यक्रमासाठी योग्य जागा निवडा. तेथे टेबल ठेवा. बॅटरी (सेल), विद्युत प्रवाह, रेडिओ संच योग्य स्थितीत आहे का, हे तपासून पहा.
- रेडिओच्या ज्या स्टेशनवर 'मीनाची दुनिया' प्रसारित होणार आहे ते स्टेशन सेट करुन (जुळवून) घ्यावे.
- आवाजाची स्पष्टता तपासून घ्या. आवाजाचा स्तरदेखील ठरवून ठेवा.
- आवश्यक असेल तर वर्गाची बैठक रचना बदलली जाऊ शकते. जसे, मुलांची रेडिओ संचाच्या आजूबाजूला बसण्याची व्यवस्था करता येते.
- आपण दारे खिडक्याही बंद करु शकता, जेणेकरुन बाहेरच्या गोंगाटामुळे



कार्यक्रम ऐकण्यात व्यत्यय येणार नाही. पण यामुळे वर्गातील प्रकाश कमी होणार नाही किंवा मोकळी हवा अडणार नाही, याची खबरदारी घ्यावी.


- ठरवण्यात आलेल्या उपक्रमांसाठी कागद, चित्र, रंगखडू इत्यादी सर्व आवश्यक सामग्री तयार ठेवावी.

## २. आपल्या विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, तसेच त्यांची एकाग्रता भंग होणार नाही यासाठी विद्यार्थ्यांना तयार करणे-

- कार्यक्रम ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमीच ठेवावी. कमाल संख्या ५० असावी.
- विद्यार्थ्यांना जर पाणी प्यायचे असेल किंवा स्वच्छता गृह वापरायचे असेल तर कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच हे सगळे उरकून घ्यावे.
- आपली विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षा आहे ते त्यांना स्पष्टपणे सांगावे. जसे शिस्तीचे पालन करणे, लक्षपूर्वक ऐकणे, विचार विनिमय, चर्चा आणि विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी होणे इत्यादी. (लक्षात ठेवा, वरील गोष्टी स्पष्ट करत असताना मुलांना आपण कुठली तरी गंभीर परीक्षा देणार आहोत असे मात्र जाणवू देऊ नका.)
- मुलांच्या सर्व शंका आगोदरच दूर करा म्हणजे गैरसमज होणार नाहीत.

## ३. कार्यक्रमाच्या पूर्वप्रसारित घटकांची आपण शिक्षक म्हणून पुनरावृत्ती करा.

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रसारित होणाऱ्या घटनांबाबत उत्सुकता राहील. कार्यक्रम ऐकण्यासाठी मुले तत्पर राहतील, तसेच कार्यक्रमात मग्न राहतील.



एरवी प्रसारित झालेल्या कार्यक्रमासंबंधी विद्यार्थ्यांशी १-२ मिनिटे प्रश्नोतरे करावीत. जसे- काल मीनाच्या गोष्टीचा विषय काय होता? या गोष्टीतील मुख्य संदेश काय होता? तुम्ही या घटनांची चर्चा घरात कोणाशी केली का? चला, आता आजची गोष्ट ऐकू. पाहूया, मीना आज काय सांगू इच्छिते?



रडिओ कार्यक्रम ऐकल्यावर मुलांची कल्पनाशक्ती रूप घेऊ लागते. कारण जे शब्द ते ऐकतात, त्याचे ते कल्पनेने दृश्यात रूपांतर करतात.

### रेडिओ कार्यक्रम प्रसारणादरम्यान काय केले पाहिजे? (१५ मिनिटे)


### १. रेडिओ कार्यक्रमाचे पुनःप्रसारण होत नाही, त्यामुळे आपण आणि आपले विद्यार्थी यांनी कार्यक्रम लक्षपूर्वक ऐकावा.

- मुख्य संदेश, अनुभव, गीताचे शब्द, गाण्याची चाल, कठीण शब्द यावर लक्ष ठेवावे. त्यांची नोंद करुन घ्यावी.
- आपण आपल्या विचाराने उपक्रमांमध्ये बदल करुन त्याला आणखी चांगले बनवू शकता, नवनवीन प्रश्न विचारु शकता.

उदाहरणार्थ जर कुठल्या कोडयात विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी ३ वस्तूंची यादी बनवायची असेल तर या वस्तूंमध्ये आणखी कोणकोणत्या वस्तूंचे नाव जोडता येऊ शकते? हे देखील विचारता येते.

### २. शिक्षक म्हणून अनुशासन आणि एकाग्रता यात उणीव न येऊ देणे.

❒ अशा स्थितीत आपण वर्गावर सतत नियंत्रण ठेवावे अणि समस्यांचे पूर्वानुमान लावून त्या दूर करण्यासाठी तयार रहावे. जसेः दोन विद्यार्थी





आपापसात बोलत असतील तर दोघांना वेगवेगळे बसवावे. कोणा विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत असेल तर त्याला पहिल्या ओळीत बसवावे. इत्यादी

❑ विद्यार्थी आपल्या शिक्षकांच्या वर्तनावर विशेष लक्ष देतात, म्हणूनच आपली देहबोली (शरीर संकेत, चेहऱ्यावरचे हाव-भाव, उठण्या बसण्याची पद्धत) नकारात्मक वाटू देऊ नये. (आपले लक्ष नाही, आपण रागात आहात किंवा कार्यक्रमात आपल्याला अजिबात रस नाही, असे बिलकूल वाटायला नको)

## रेडिओ प्रासारणानंतर काय केले पाहिजे? (१५ मिनिटे)

शिकण्याच्या प्रक्रियेत आनंदाबरोबर आवडही शिल्लक रहावी म्हणूनच हे सत्र क्रिया-प्रक्रियेद्वारे चालवले जाते. मीनाच्या गोष्टीत देण्यात आलेल्या सकारात्मक संदेशाला इथे प्रबलता मिळते, मान्यता मिळते. चर्चा आणि उपक्रमांच्या मदतीने जीवन कौशल्य शिकण्यास मदत मिळते.

एक शिक्षक म्हणून आपल्याकडे या कार्यक्रमासाठी पूर्वनिर्धारित योजना तयार असली पाहिजे, ज्यामध्ये 'मीनाची गोष्ट' या विभागाबद्दल प्रश्नोत्तरांसाठी ५ मिनिटांचा वेळ राखून ठेवलेला असावा. गोष्टीतील मुख्य संदेश आणि मुद्दे यावर चर्चा करण्यासाठी ४ ते ५ मिनिटे आणि विविध उपक्रमांसाठी (गाणे, खेळ, सामूहिक कार्य) ४ ते ५ मिनिटांचा वेळ राखून ठेवलेला असावा. जर विद्यार्थी मानसिक रूपाने या प्रक्रियेत सहभागी होत नसेल तर तो व्यवस्थित शिकू शकणार नाही, म्हणून पुढील प्रकारे सुरुवात करावी.

### १. समज आणि ज्ञान वाढविण्यासाठी प्रश्नोत्तरांना चालना देणे.

- विद्यार्थ्यांना तीच गोष्ट संक्षिप्त रूपात सांगण्यास सांगा. याला थोडे मजेदार बनवण्यासाठी एका विद्यार्थ्याला गोष्ट सुरु करायला सांगा आणि दुसऱ्या विद्यार्थ्याला गोष्ट पुढे न्यायला सांगा. याच प्रकारे एका नंतर एक विद्यार्थ्याला गोष्ट पुढे न्यायला सांगा आणि गोष्ट पूर्ण करा.

- गोष्ट आणि गोष्टीतील पात्रांसंबंधी विस्तृत माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करा. जसेः तुम्हांला यामधले कोणते पात्र जास्त आवडले आणि का? मदत करण्यासाठी मीनाने काय केले? शेवटी काय झाले? इत्यादी
- गाणे आणि खेळ यासंबंधी देखील काही प्रश्न विचारावेत. जसेः गाण्याची कोणती ओळ त्यांच्या लक्षात आहे? ते कोणती ओळ गाऊन दाखवू शकतात?




## २. यानंतर प्रसारित घटनेच्या मुख्य संदेशावर आणि मुद्दयांवर वर्गात चर्चा करा.

- आपले विद्यार्थी या विषयी काय विचार करतात? काय समजतात? इथून सुरुवात करा.
- शिक्षण आवश्यक आहे असे तुम्हांला वाटते का? मुलींनी शिकणे गरजेचे आहे का? असेल तर का? तुम्ही कुठल्याही तीन उच्चशिक्षित प्रसिद्ध लोकांची नावे सांगू शकता का? तुमची आदर्श व्यक्ती कोण आहे? या उत्तरांवर चर्चा करत शिक्षणाचे महत्त्व पटवून द्या.
- मुलांच्या व्यक्तिगत अनुभवांना गोष्टीतील संदेश व मुद्दे यांच्याशी भावनात्मक स्तरांवर जोडण्याचा प्रयत्न करा. जसेः शिक्षणाने त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला काय फायदे झाले? आता या संदर्भाला मीनाशी जोडता येईल, जसे की, ती शाळेत शिकली म्हणून तिला लाला (दुकानदार) ची लबाडी पकडता आली (जेव्हा लाला राणीच्या वडिलांना फसवत होता)

## ३. समस्येवर उपाय न देता स्वतः विद्यार्थ्यांनाच विचार करण्यास प्रेरित करा.

- समस्यांना आपल्या समजुतदारपणाने, आपल्या पद्धतीने सोडवण्याचा प्रयत्न करण्यास सांगणे. विद्यार्थ्यांसमोर कुठली तरी कठीण परिस्थिती



मांडा आणि त्यांना स्वतःच त्या समस्यांवर उपाय सुचवण्यास सांगा जसे तुमच्या मित्राची बहीण शाळेत जाऊ इच्छिते-तुम्ही तिची मदत कशी कराल? तिच्या कुटुंबियांना कसे समजवाल?

- दुसरी पद्धत ही आहे की, तुम्ही विद्यार्थ्यांना कुठल्याही एका समस्येचे ३ उपाय सांगा आणि त्यातून एक सर्वोत्तम उपाय निवडण्यास सांगा तसेच तोच उपाय का निवडला याची कारणे विचारा. जसेः अमिताच्या आई वडिलांना वाटते की, फक्त तिच्या भावांनीच शिक्षण घ्यावे, पण का?



अ- ते हुशार होतील.

ब- ते कुटुंबाला मदत करु शकतील.

क- मुले आणि मुली यांना शिक्षणाचा समान अधिकार आहे हे त्यांना माहीत नाही.

- वर्गात वाद-विवादाचे आयोजन करा. वर्गातील विद्यार्थ्यांना दोन गटात विभाजित करा. कुठल्या तरी एका मुद्दयाचे एका गटाला समर्थन तर दुसऱ्या गटाला विरोध करावयास सांगा. जसेः मुलींनी शाळेत गेले पाहिजे की घरकामांत मदत केली पाहिजे.

## ४. शिक्षक म्हणून आपण विद्यार्थ्यांना निर्णय घेण्यास मदत करु शकता.

⌘ विद्यार्थ्यांना काही बोलायचे असेल तर त्यांना बोलण्यास प्रोत्साहित करा. त्यांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐका आणि विद्यार्थी तुमच्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत याची त्यांना जाणीव करुन द्या.




⌘ तुम्हांला हे माहीत आहे की, प्रत्येक विद्यार्थी वेगळा आहे आणि तुम्हांला हे मान्यही आहे. तुमची ही मान्यता मानण्याची प्रेरणा इतर विद्यार्थ्यांनाही द्या. जसे: जर कुठल्या विद्यार्थ्याच्या काही बोलण्यावर दुसरे विद्यार्थी हसत असतील तर तुम्ही त्या विद्यार्थ्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐका आणि त्याच्या प्रयत्नांची प्रशंसा करा.

⌘ विद्यार्थी कोणत्या प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होतात, कोणत्या प्रकारे आपल्या भावना व्यक्त करतात याकडे लक्ष द्या. तुम्हांला दिसेल की, २-३ विद्यार्थी यामध्ये भाग घेत नाहीत. त्यांचे लक्ष कार्यक्रमात लागत नाही. ही गोष्ट नोंदवून ठेवा. जर परत-परत असे होत असेल तर त्या विद्यार्थ्याला तुमच्या विशेष मदतीची व लक्ष देण्याची गरज आहे.

## ५. कमी बोलणाऱ्या किंवा बोलणे टाळणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करा.

- शिक्षक म्हणून अशा विद्यार्थ्यांना वर्गात चर्चेमध्ये बोलून, साधे प्रश्न विचारून, पुस्तक वाचण्यास सांगून, छोटी-छोटी सोपी कामे देऊन, (जसे: वर्गाची तयारी करताना दारे-खिडक्या बंद करण्यास सांगणे.) बोलते करण्याचा प्रयत्न करा. या मार्गानेही लाभ झाला नाही तर वास्तविक कारण शोधण्याचा प्रयत्न करा. कधी कधी व्यक्तिगत कारणांमुळे देखील अशी समस्या निर्माण होऊ शकते.
- कोणत्याही विद्यार्थ्याला इतर मुलांसमोर 'हा फारच लाजाळू आहे' असे वा अन्य कोणतेही बिरुद (लेबल) लावू नये. यामुळे अशा मुलांचा त्रास जास्त वाढतो आणि ती आणखी जास्त संकोचू लागतात.
- लाजाळू विद्यार्थ्यांना जबरदस्तीने उपक्रमात सामील करुनही उपयोग होणार नाही, हळूहळू त्यांना प्रोत्साहन द्या, त्यांचा आत्मविश्वास वाढवा. जोपर्यंत असे विद्यार्थी आत्मविश्वासाने जबाबदारी स्वीकारत नाहीत तोपर्यंत त्यांना प्रोत्साहन देणे सुरुच ठेवा.






- लाजाळू आणि बोलणे टाळणाऱ्या विद्यार्थ्यांना, आत्मविश्वासाने जबाबदारी स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांजवळ बसवा. आपसांतील सामंजस्याने अशा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

## ६. शिक्षक म्हणून तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांना रेडिओवरुन प्रसारित होणाऱ्या 'मीनाची गोष्ट' कार्यक्रमाची चर्चा त्यांच्या घरातील इतर सदस्यांशी करण्याची प्रेरणा द्या.

- विद्यार्थ्याला घरी जाऊन रेडिओवर प्रसारित मीनाची गोष्ट कुटुंबातील इतर सदस्यांना सांगण्यास सांगा. यामुळे आई-वडील, बहीण-भाऊ, आजी-आजोबा यांच्यातील नाते मजबूत होण्यास मदत होईल.
- पाठयक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मुख्य मुद्दे, संदेश यावर कुटुंबियांशी चर्चा केली पाहिजे, प्रश्न विचारले पाहिजे, कुटुंबियाचे विचार आणि सल्ले ऐकले पाहिजेत. यामुळेच काही काळानंतर त्यांच्या व्यवहारात, विचारात, मनोवृत्तीत बदल होईल. उदाहरणार्थः मुलांनी आई-वडील, आजी-आजोबा यांना मुलींच्या शिक्षणाबाबत त्यांचे मत विचारावे.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या घरातील अनुभवांची वर्गातील इतरांशी देवाण घेवाण करण्यास सांगावे.
- यामुळे मुलांचा आत्मसन्मान वाढतो आणि कुटुंबातील घटनांमधे, निर्णय प्रक्रियेत सामील होण्यास प्रोत्साहन मिळते, आत्मविश्वास वाढतो.

## ७. एक शिक्षक म्हणून मुलांच्या शैक्षणिक प्रवृत्तींना वाव द्या- शिक्षणाची पद्धत क्रिया-प्रक्रियायुक्त बनवा.

- वाद-विवाद, चर्चा, नाटक, खेळ, कोडी, चित्र, पोस्टर इत्यादी विद्यार्थ्यांना विचार करण्यास व काम करण्यास आत्मनिर्भर बनवतात.
- आपण विद्यार्थ्यांना स्पर्श, गंध, दृश्य इत्यादी विविध पद्धतीने शिकण्यास मदत करू शकता. जसेः फुलांचे प्रकार शिकण्यासाठी बागेत सहल काढू शकता. तिथे वेगवेगळी फुले मुलांना दाखवू शकता, फुलांना स्पर्श करु शकता, त्यांचा सुवास घेऊ शकता. असे करण्याने मुलांना




सर्व माहिती व्यवस्थित लक्षात राहील.

- 'हातांची स्वच्छता' या चर्चेच्या वेळी हात धुण्याची योग्य पद्धत करुन दाखवण्याने जास्त फायदा होईल.
- मुलांना शिकण्याच्या वेगवेगळया पद्धतीत सामील होणे आवडत असते. मुलगा-मुलगी समानता हा विषय पात्र निर्मिती करुन चांगल्या प्रकारे दर्शविता येते. जसेः 'आंब्याची वाटणी' या गोष्टीत राजू आणि मीना एक दिवस आपली कामे अदलाबदल करतात.
- शिकण्यामध्ये रुची वाढवण्यासाठी मुलांकडून चित्र काढून घ्या. यामुळे कल्पनाशक्तीचा विकास होतो. जसेः प्रसारित रेडिओ कार्यक्रमात त्यांना जी गोष्ट आवडली त्याचे चित्र काढण्यास सांगा. उदाहरणार्थः काही मुद्दे जसेः मित्रता, बालमजुरी, स्वच्छ पाणी इत्यादी.
- वर्गाला समूहकार्यासाठी दोन गटात विभागा आणि त्यांना आपले कार्य सर्वांसमोर सादर करण्यास सांगा. समूहकार्यात ए.एन.एम ताईंशी रक्तक्षय (ॲनिमिया) संबंधी मुलाखत घ्यावी.

**लक्षात ठेवा**

आपण जे ऐकतो त्यापैकी २० %
आपण जे पाहतो त्यापैकी ४० %
आणि आपण स्वतः जे करतो, शोधतो
त्यापैकी ८० % आपल्या लक्षात राहते.



## शिक्षकांसाठी सूचना


आपल्या विद्यार्थ्यांशी, ते जी भाषा व्यवस्थितपणे समजू शकत असतील त्याच भाषेत बोलावे. असेच शब्द, उदाहरण किंवा परिस्थिती सांगावी ज्यांच्याशी ते परिचित असतील.

त्यांचा देश, समाज आणि भोवतालचे जग यांच्याशी संबंधित मुद्दयां वरील चर्चेत त्यांना सहभागी होण्याची संधी द्या. उदाहरणार्थ मुलांना समजवा की, नळ किंवा हॅंड-पंप पूर्ण बंद करा. पाणी का वाचवले पाहिजे? त्यांना माहिती मिळवू द्या की, पाण्याच्या कमतरतेमुळे आपल्या देशाला कोणत्या संकटांना तोंड द्यावे लागेल? इतर देशांचेही काय हाल होतील?

आपल्याला हे सत्य स्वीकारुन चालावे लागेल की प्रत्येक विद्यार्थी वेगवेगळया पार्श्वभूमीतून आलेला असतो. त्याचे विचार, व्यवहार, मनोवृत्ती, कल, आवडी आणि पूर्वग्रहांमुळे शिक्षण ग्रहण करण्याच्या क्षमतेचा स्तरही वेगवेगळा असतो. एक शिक्षक या नात्याने आपण मुलांच्या अनुभवांना योग्य वळण लावून त्यांच्यात सहनशीलता, सहिष्णुता या भावना वाढवू शकता. जसे दुसऱ्या धर्माबद्दल आदर बाळगणे. तुम्ही विविध धर्मांचे सण-वार, रीती-रिवाज, राहण्याच्या व खाण्याच्या पद्धतीं बद्दल चर्चा करु शकता.

आपल्या विद्यार्थ्यांमधे आदर मिळवण्यासाठी हे गरजेचे आहे की, तुम्ही मुलांमध्ये मिसळले पाहिजे, त्यांच्याशी बोलले पाहिजे, मुले आणि शिक्षक यांच्यात ताळमेळ असला पाहिजे. यामुळे तुम्हांला मुलांमधले विशेष गुण आणि उणीवा कळतील. त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी याचा उपयोग करता येईल.





उदाहरणार्थः मीनाच्या शिक्षिका सर्वांना आवडतात, सगळे त्यांचा आदर करतात कारण, त्या सगळयांचे म्हणणे ऐकून घेतात. मुलांच्या व्यक्तिमत्वाला विकसित होण्याची संधी देतात. पण राजूच्या शिक्षिका, ज्या खूप कडक शिस्तीच्या आहेत, त्या अशा नाहीत.

विद्यार्थ्यांना वर्गात शिकवताना, त्यांच्याशी बोलताना, त्यांच्यात मिसळताना तुम्ही मुलगा-मुलगी समानता या मुद्दयाला नेहमी समर्थन देत जा. जसेः खेळ आणि गणितात मुले मुलींपेक्षा सरस आहेत असे वाक्य बोलण्यात आणू नये.

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. रेडिओ कार्यक्रम बंद होताच शिक्षण बंद, असे होणार नाही याची काळजी घ्या.



## पूर्वावलोकन आणि पुनरावृत्तीसाठी विविध उपक्रमांच्या सूचना

एक शिक्षक म्हणून आपली इथे विशेष भूमिका आहे. आपल्याला हे निश्चित करायचे आहे की, मीना-राजू मंचच्या साप्ताहिक भेटी कार्यक्रमात प्रस्तुत मुद्दयांवर चर्चा होईल. याच मुद्दयांना इतर विद्यार्थी, मित्र, पालक यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे नव-नवीन मार्ग शोधावेत. मीना-राजू मंचशी संलग्न सगळया मुलांना खेळांत, नाटकात तसेच इतर उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेतले पाहिजे, जे ते वर्गात शिकले आहेत.

मीना-राजू मंचच्या कार्याला वाढवण्यासाठी चांगले काम करणारे शिक्षक किंवा विद्यार्थी यांचे नाव आपण विशेष प्रमाणपत्रासाठी सुचवू शकता.


### १. कुटुंबात गोष्ट सांगितल्यावर आलेला अनुभव वर्गात सांगणे.

रोजच्या दिनचर्येप्रमाणेच मीनाची गोष्ट कुटुंबात सर्वांना सांगणे आणि त्यात मांडण्यात आलेल्या मुद्दयावर चर्चा करणे यासाठी मुलांना आपण तयार केले आहेच. आता या नंतर दुसऱ्या चरणात त्यांच्या कुटुंबियांच्या प्रतिक्रिया, ते काय म्हणाले ? हे आपल्या वर्गात सर्वांना सांगावे. या प्रकारची आपसात अनुभवांची देवाण-घेवाण रोमांचक असेल, तसेच आनंद देणारी ही असेल.

### २. आपल्या (शिक्षकांच्या) मदतीने माहिती मिळवण्याच्या उपक्रमांची सुरुवात करणे.

समूह-कार्यादरम्यान विद्यार्थी एक दुसऱ्याकडून काहीना काही शिकतील, त्यांच्यातील नेतृत्व गुण विकसित होतील आणि नवीन विद्यार्थ्यांसाठी ते आदर्श बनतील.

विद्यार्थ्यांना छोटया-छोटया गटात विभाजित करा आणि त्यांना गावाचा नकाशा बनवायला सांगा. उद्देश हा की, आरोग्य संबंधित मुद्दे, जसे पीण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय, नळ वा तलाव या गावात कुठे आहे ते नकाशात दाखवणे. तसेच प्रत्येक मुलाने आपल्या घराचा नकाशा बनवून त्यात पाण्याचा नळ, शौचालय आणि साबण कोठे आहे ते दर्शवावे.



साबणाच्या वापरासंबंधी हे काम दोन प्रकारे केले जाऊ शकतेः




**अ-** जेवणापूर्वी किंवा शौचानंतर लोक साबणाने हात का धूत नाहीत? याची तपासणी करा. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केल्यावर काही कारणे लक्षात येतील जसेः

- गावात साबण मिळत नाही.
- शौचालय आणि नळ (बादली) यात खूप अंतर आहे.

काही लोकांच्या घरात शौचालय नसल्यामुळे त्यांना शौचासाठी शेत किंवा मैदानात दूर जावे लागते. इतक्या दूर साबण, पाणी घेऊन जाणे कठीण आहे.

**ब-** जे विद्यार्थी गणित आणि अंक यांचे चांगले जाणकार आहेत किंवा ज्यांना त्यात रस आहे, त्या विद्यार्थ्यांनी या उपलब्ध माहितीतील आकडे गोळा करुन टक्केवारी काढावी. जसेः

- किती टक्के घरात शौचालय नाही?
- किती टक्के लोक साबणाचा वापर करत नाहीत?
- किती टक्के लोक जेवणापूर्वी आणि शौचानंतर साबणाने हात धुतात? हे कार्य वेगळे आहे आणि मजेदारही आहे.
- आपल्या गावात आवश्यक सरकारी सुविधा जसेः पंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा कुठे उपलब्ध आहेत? शोधून काढा.
- आपल्या गावात किती हॅंड-पंप आहेत? किती घरे या हॅंड-पंपच्या स्वच्छ पाण्याचा वापर करतात?
- किती मुलांचे लसीकरण झाले आहे? किती मुलांचे लसीकरण बाकी आहे?





## पालक आणि समाजाबरोबर पुनरावृत्ती व पूर्वावलोकन करण्यासाठी योग्य कार्याच्या सूचना.

☞ पालक-शिक्षक संघटनेच्या सभेत आपण पालकांबरोबर मीनाच्या रेडिओ कार्यक्रमांतील मुद्दयांवर चर्चा करु शकता (विशेष करुन मुले जेव्हा त्यांना मीनाच्या गोष्टींबद्दल माहिती देत असतात)


☞ पालक-शिक्षक संघटनेच्या सभेत मुलांना मीनाच्या संदेशावर, मुद्दयांवर संवाद अभिनय किंवा गाणे गाण्याची संधी देऊन पालकांनाही सहभागी होण्यास प्रोत्साहित करता येते.

☞ पालकांनाही शाळेतील कार्यक्रमांत जबाबदारी घेण्यासाठी, कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करता येते. जसेः बक्षीस वितरण समारोह, नाटक किंवा विशेष दिवस उदाहरणार्थः 'मीना दिवस', 'बहीण-भाऊ दिवस' या दिवशी मुलगा-मुलगी समानतेला चालना देता येते. 'आजोबा-आजी दिवस' पण साजरा केला जाऊ शकतो. यामुळे आजोबा-आजी देखील या कार्यक्रमांत सहभागी होतील.

☞ आपण सामाजिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करु शकतो. उदहरणार्थः लसीकरण, प्रौढ शिक्षा अभियान इत्यादी. ज्यामध्ये पालक, समाजाचे सदस्य आणि अन्य समूह उदाहरणार्थः रेडिओ श्रोता संघ, स्वयंसेवा दल, मीना-राजू मंचमधील मुला-मुलींनाही यात सामील करुन घेता येते.

☞ मीना रेडिओ कार्यक्रम आणि त्याच्याशी संबंधित सामाजिक प्रवृत्तींना प्रोत्साहन देण्यात 'शाळा व्यवस्थापन समिती' यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्याकडून या सर्व घटकांना मिळून काम करण्यास प्रेरित केले जाऊ शकते.








☞ आकाशवाणी कार्यक्रमानुसार शाळा व्यवस्थापन समिती तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांची मदत घेवून आपण स्थानिक स्तरावर अन्य मोहिम चालवू शकतो. जसेः पाणी पूरवठा व आरोग्य विभागाद्वारे मीना कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले जाऊ शकते ज्यामध्ये शाळेतील मुलांकडून आजू-बाजूच्या परिसराची स्वच्छता केली जाऊ शकते किंवा पूर्ण वस्तीमध्ये स्वच्छता आणि साफ सफाईची माहिती देण्याचा कार्यक्रम बनवला जाऊ शकतो.

☞ मीनाचे संदेश आणि मुद्दे यांची माहिती देण्यासाठी 'बालमित्र पंचायत' ची स्थापना हाही एक मार्ग आहे.

☞ मीना–राजू मंच, किशोरी-बालिका संगठन, युवा मंच इत्यादी संस्था पथनाटय, स्नेह-मीलन, प्रीति-भोजन इत्यादी कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी घेऊ शकतात. जसे वृक्षरोपण कार्यक्रम ज्यामध्ये 'झाडे वाचवा' अभियान सुरु केले जाऊ शकते.

☞ मीना–राजू मंचचे सदस्य घरोघर जाऊन मीनाच्या प्रसारित कार्यक्रमातील गोष्टी सांगू शकतात. या गोष्टींचे दाखले देऊन लोकांच्या शंका दूर करता येतात, संदेश पोचवता येतात. उदाहरणार्थः जर पालकांना वाटते की मुलींनी शाळेत जाण्याऐवजी शेतात त्यांना मदत करावी, अशा वेळी असा काय पर्याय सुचवता येईल की ज्यामुळे मुलींची शाळा बंद होणार नाही.

☞ मीना–राजू मंच द्वारे 'प्रभाग समिती' च्या सभेतही मीना रेडिओ कार्यक्रमाची माहिती दिली जावी आणि त्यांना कार्यक्रम ऐकण्यासाठी प्रेरित केले जावे, जेणेकरुन संदेश आणि मुद्दे त्यांच्या पर्यंत पोचतील आणि समस्या सोडविण्याची आणखी एक संधी मिळेल.



## लक्षात ठेवा

★ एक शिक्षक म्हणून मीना रेडिओ कार्यक्रमांतर्गत आपली भूमिका खूप महत्त्वपूर्ण आहे.

★ आपल्या योगदानानेच मुले नव-नवीन गोष्टी शिकतील, अर्थात आपल्या कार्यक्रमाच्या सफलतेची किल्ली आपल्याच हातात आहे.

★ मीना कार्यक्रम मुले आणि मुली दोघांसाठीही आहे. प्रसारित कार्यक्रमामधून मुला-मुलींना महत्त्वपूर्ण माहितीतून शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाते.

★ मुलींच्या समस्या, त्यांचे मद्दे या विषयी मुलांनाही संवेदनशील बनवणे आवश्यक आहे, मुलींविषयी आदर असणेही गरजेचे आहे. मीना रेडिओ प्रसारणाद्वारे मुलांना कोवळया वयापासूनच या मुद्याविषयी जागरुक होण्याची संधी मिळते.

★ पालक आणि समाजाचे सदस्य यांना रेडिओ कार्यक्रमांत सामील होण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम करुन, आपण एका चांगल्या कामाचे नेतृत्व करीत आहात आणि बदल घडण्यासाठी स्वस्थ वातावरण तयार करण्यात आपले महत्त्वपूर्ण योगदान देत आहात.



## शिक्षणाद्वारे विकसित करण्यात येणारी आवश्यक जीवन कौशल्ये

### जीवन कौशल्ये-

**सर्जनात्मक विचार-** काही मुले जुन्यापुराण्या पद्धती सोडून इतरांपेक्षा वेगळया मार्गाने आपली अक्कल हुशारी वापरुन समस्या सोडवतात. (उदाहरणार्थः वर्गात शिक्षकांनी जे सांगितले ते शिकण्यासाठी मीना मिठू पोपटाची मदत घेते आणि या प्रकारे ती कोंबडीचोर पकडण्यात यशस्वी होते.)

**समालोचनात्मक विचार-** समस्या किंवा अनुभवांचे विश्लेषण करुन, त्याला समजून घेऊन वास्तविकतेच्या आधारावर समस्या सोडवणे.

**तणाव आणि भावनांवर नियंत्रण ठेवणे-** तणावाचे कारण शोधून काढणे, तणावामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यावर काय परिणाम होत आहे हे जाणून घेणे आणि त्यावर ताबा मिळविणे, या कलेत मुले प्रावीण्य मिळवू शकतात.

**निर्णय घेण्याची कला-** विविध प्रक्रियेद्वारे विद्यार्थी कोणत्याही समस्येवर उपाय शोधून काढतात आणि मग समस्या सोडविण्यासाठी सर्वात उत्तम आणि उपयुक्त मार्गाची निवड करतात.

**प्रभावशाली संवाद-** देहबोली आणि शब्दांची भाषा यांचा योग्य वापर करुन आपल्या अभिव्यक्तीमध्ये कौशल्य मिळवून प्रभावशाली संवादात विद्यार्थी यश्स्वी होतो.

**सहिष्णुता (सहानुभूती)-** इतर व्यक्तींच्या समस्या आणि परिस्थिती आपल्या कल्पनाशक्तीने समजून घेता येतात. यामुळे जी व्यक्ती आपल्यापेक्षा खूप वेगळी आहे, तिलाही सहज स्वीकारण्यास मदत होते.

**आपसांतील संबंध-** या कलेमुळे मुलांना हे समजते की दुसरी व्यक्ती या परिस्थितीत कसे वर्तन करेल. यामुळे त्यांच्या मैत्रीला तडा जात नाही.




**तडजोडीची कौशल्ये-** यामुळे विरोध सहन करणे, समस्या सोडवणे, इतरांशी ताळमेळ बसवणे यात मदत मिळते. काही मिळवण्यासाठी काही गमावणे या नीतीमुळे समस्या सोडवणे सोपे जाते.

**समस्या सोडवणे-** कठीण परिस्थितीत मुले अनेक अडथळे एका नंतर एक पार करण्यासाठी सर्वात उत्तम मार्ग निवडतात. त्यानुसार क्रिया करुन कठीण परिस्थितीतून सहजपणे बाहेर पडतात आणि समस्या सोडवतात.

**स्वतःला ओळखणे-** यामुळे मुलांना स्वतःची खरी ओळख पटते. स्वतःचा स्वभाव, चरित्र, विशेष गुण, उणीवा, आवड-नावड सगळयांची माहिती मिळते.

रेडिओ प्रसारणानंतर राबवण्यात येणारे उपक्रम.

**(सूचनाः प्रसारणानंतर करता येऊ शकणारे काही उपक्रम व गोष्टी इथे प्रस्तुत करण्यात येत आहेत, ज्यांचे उदाहरण घेऊन शिक्षक उपक्रमांची निर्मिती करतात)**



## सामाजिक ओळख

सर्व सहभागी गोलाकार उभे राहतील आणि गटसंचालिका त्यांना विविध प्रश्न विचारतील. प्रश्नाचे उत्तर होय असेल तर उत्तर देणारा सहभागी गोलात उडी मारेल. खेळाच्या शेवटी या सर्व प्रश्नांवर चर्चा केली जाऊ शकते.

### प्रश्नांचे प्रकार-

- कुणा कुणाचे छोटे भाऊ-बहीण आहेत?
- आजारी पडल्यावर उपचार करुन घेण्यासाठी कोण-कोण डॉक्टर कडे जाते?
- कोणाच्या घरात भाऊ-बहीण दोघेही घरकामात मदत करतात?
- कोणी गावाबाहेर प्रवास केला आहे? रेल्वेचा प्रवास कोणी केला आहे?
- कोण-कोण घरुन एकटेच शाळेत येते-जाते?
- कोणाच्या घरात शौचालय बांधलेले आहे?
- कोण-कोण घरी स्वयंपाक करुन किंवा घरातली कामे करुन शाळेत आले आहे?

### लहान वयात लग्न-

१. लग्नाचे कायदेशीर वय काय आहे? त्याचे महत्त्व काय आहे?

२. जर लहान वयात लग्न झाले तर त्यामुळे काय धोके होऊ शकतात?



## लहान वयात लग्न

लग्न एक सामाजिक बंधन आहे. पति-पत्नीच्या नात्याने बांधले गेलेले स्त्री -पुरुष आपले कुटुंब तयार करतात. कुटुंबाचे भरण-पोषण, मुलांचे संगोपन, वडीलधाऱ्याची काळजी घेणे अशा जबाबदाऱ्या पार पाडतात.


आपल्या देशात लग्नासंबंधी एक कायदा आहे, ज्या अंतर्गत लग्नाच्या वेळी मुलीचे वय कमीत कमी १८ वर्षे आणि मुलाचे वय कमीत कमी २१ वर्षे असले पाहिजे. या कायद्याचे कारण हे आहे की, जेव्हा लग्न होईल तेव्हा मुलगा मुलगी दोघेही परिपक्व व्हावेत आणि लग्नामुळे येणाऱ्या जबाबदाऱ्या पेलण्यास ते सक्षम व्हावेत! लग्नाच्या कायदेशीर वयापूर्वीची वर्षे मुलगा-मुलगी दोघांनाही शिक्षण घेण्यासाठी, काही तरी कौशल्ये शीकण्यासाठी, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्यासाठी आणि बरे-वाईट यात फरक करायला शिकण्यासाठी उपयोगी असतात.

तरी पण बरेच लोक या कायद्याचे उल्लंघन करुन मुला-मुलींची लग्ने लहान वयात करतात. अशा परिस्थितीत मुलगा-मुलगी दोघांनाही खूप कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागते. लहान वयाचे पति-पत्नी वैवाहिक जीवनाच्या ओझ्याखाली दबून जातात.

लहान वयाच्या पति-पत्नींना खूप प्रकारच्या समस्या येऊ शकतात. उदाहरणार्थ

### व्यवहारिक ज्ञानाची उणीव-

वैवाहिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी मुलगा-मुलगी दोघेही मानसिक दृष्टया पूर्ण तयार झालेले नसतात. व्यवहारज्ञान व अनुभवाच्या कमतरतेमुळे त्यांना स्वतःच्या आणि आपल्या मुलांच्या गरजा पूर्ण करताना खूप त्रास होतो.



**क्षमतेची कमतरता-** त्यांचा शारीरिक विकास पूर्ण होऊ शकत नाही. त्यांचे शिक्षणही पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांचे व त्यांच्या मुलांचे भविष्य अंधकारमय होऊन जाते. मुलावर पैसे कमावण्याची, पत्नी व मुलांची जबाबदारी येते तर मुलीवर घर सांभाळणे, मुलांना जन्म देणे आणि त्यांना सांभाळण्याची जबाबदारी येते.


या सर्व कारणांनी पति-पत्नी दोघेही वयापूर्वीच म्हातारे होतात.

## जर कायदेशीर वयानंतर मुला-मुलींचे लग्न झाले तर त्यांना खालील फायदे होतील.

- ते आपले शिक्षण पूर्ण करु शकतील.
- त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी वाढतील.
- ते कुटुंब सांभाळण्यास परिपक्व होतील आणि योग्य निर्णय घ्यायला सक्षम होतील.
- ते आपला जीवनसाथी व सासरचे लोक यांच्याशी नातेसंबंध बनवायला भावनिक दृष्ट्या तयार होतील.
- किशोरवयीन मुली लहान वयात आई होण्याच्या धोक्यापासून वाचतील.

## बाल-विवाहः लहान वयात लग्न-नसीमा आणि असलमची गोष्ट.

चेतना लखनऊ जिल्ह्यातील एक गाव गद्दी खेडा. त्या गावची अधिकांश लोकसंख्या मुस्लिम धर्मिय आहे. या गावात खूप वर्षापासून बालविवाहाची कुप्रथा प्रचलित आहे. काही पालक तर बालकाच्या जन्मापूर्वीच त्याचे लग्न जमवायचे. संयोगाने जर विरुद्ध लिंगी बालक जन्माला आले तर दोन-तीन वर्षात दुसरे बालक दत्तक घेऊन लग्न लावण्यात येई. जर त्यांनी असे केले नाही तर समाज त्यांना वाळीत टाकत असे. या प्रकारच्या बाल-विवाहांमुळे अनेक समस्या उत्पन्न होत होत्या. लहान वयातच एकाचा मृत्यु झाला तर त्याच्या जोडीदाराचे दुसरे लग्न होण्यात अडचणी येत. हळूहळू शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारामुळे लोकांमधे जागृती झाली आणि लोकांनी या कुप्रथेविरुद्ध आवाज उठवला. याची सुरुवात श्रीमती.





नसीमा यांनी केली.

नसीमाचे लग्न तिच्या आई वडिलांनी ती ३ वर्षाची असताना ४ वर्षाच्या असलमशी लावले आणि नसीमाला १४ व्या वर्षीच सासरी पाठवले. त्यानंतर एकाच वर्षात नसीमाने एका अपरिपक्व मुलीला जन्म दिला. त्या मुलीचा जीव वाचवण्यासाठी खूप उपचार करावे लागले. उपचारांच्या खर्चासाठी त्यांना शेत गहाण ठेवावे लागले. शेत गहाण पडल्यामुळे त्या कुटुंबाच्या उत्पन्नात घट झाली, त्यामुळे ते कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले. नसीमानेही या गोष्टीची धास्ती घेऊन अंथरुण धरले. असलम रात्रंदिवस मेहनत करुनही जेमतेम पोट भरेल इतकेच कमवू शकत होता. असलम खूप उदास राहू लागला, कारण लहान वयातच त्याच्यावर खूप बोजा पडला होता. असलम विचार करु लागला की त्याने इतक्या कमी वयात नसीमाला सासरी आणून कुटुंब वाढवायला नको होते. वैतागून एकेदिवशी असलम घर सोडून निघून गेला व कधीही परत आला नाही. या सगळया दुःखाचे कारण नसीमा आहे या समजुतीने तिच्या सासू-सासऱ्यांनी तिला घराबाहेर काढले. निराधार झाल्यामुळे नसीमाला वडिलांच्या घरी परत जावे लागले. आगोदरच ९ मुलांच्या ओझ्याखाली दबलेल्या नसीमाच्या आई-वडिलांवर डोंगर कोसळला, तरीही त्यांनी नसीमाला आश्रय दिला. नसीमाही कुटुंबाला हातभार लावण्यासाठी शेतात काम करू लागली आणि रिकाम्या वेळात प्रौढ शिक्षण केंद्रात शिक्षण घेऊ लागली. हळूहळू तिने हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले आणि गावातल्या लोकांनाही शिक्षण देण्याचे ठरविले. नसीमाने सगळयांना बालविवाहाचे दुष्परिणाम समजाऊन सांगितले. सुरुवातीला तिच्या बोलण्याकडे कोणीही लक्ष दिले नाही, पण हळूहळू त्यांच्या लक्षात या गोष्टी येऊ लागल्या की, मुलांना शिकवले पाहिजे, मुलीचे लग्न १८ नंतर आणि मुलाचे २१ नंतरच केले पाहिजे.

आज कुठलेही पालक, मुलगा जो पर्यंत कमावता होत नाही तो पर्यंत त्याच्या लग्नाचा विचारही करत नाहीत आणि मुलगी १८ वर्षाची होई पर्यंत तिचे लग्न करत नाहीत. यामुळे गावातील तरुण-तरुणी आनंदी आहेत.

## दोन किशोरींच्या जीवनाची कहाणी-



### रमाची कहाणी

रमा एका गावात आपले आई-वडील आणि ६ बहीण भावांबरोबर राहत होती. रमा लहानपणापासून आई वडिलांकडून ऐकत आली आहे की जेव्हा ती १४-१५ वर्षांची होईल तेव्हा तिचे लग्न करण्यात येईल. म्हणून तिने स्वयंपाक करणे, भावंडांना सांभाळणे या सारख्या कामात आईला मदत केली पाहिजे आणि ती करायची देखील. यापेक्षा वेगळे जीवन असू शकते याचा तिने कधी विचारही केला नव्हता. आता तिचे लग्न झाले आहे आणि १६ व्या वर्षी तिला दोन जुळी मुले झाली आहेत. तिचा पती मासेमारीचा व्यवसाय करतो. त्याच्या कमाईत रमा आणि तिच्या दोन मुलांची गुजराण मोठया मुश्किलीने होते. रमाला आपले आयुष्य या प्रकारे जगायचे नाही पण तिला आयुष्य चांगले करण्यासाठी काय करावे हे माहीत नाही.

### रशीदाची कहाणी

रमाची मैत्रीण, रशीदा त्याच गावात आई-वडील आणि ४ बहीण-भावांसोबत राहत होती. रशीदा आपल्या शिक्षिकेला आपला आदर्श मानत होती. तिला त्यांच्या सारखे शिक्षिका व्हायचे होते. रशीदाने खूप मेहनत केली आणि खूप अडचणी पार करुन चांगले गुण मिळवले. तिच्या आई-

वडिलांना तिचे शिक्षण पुढे चालू ठेवण्याची अजिबात इच्छा नव्हती. त्यांना वाटायचे की, रशीदाने केवळ घरकाम करावे. रशीदाने आपल्या आई-वडिलांना आपले शिक्षण पुढे चालू ठेवण्यास राजी करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधले. सर्वात अगोदर ती आपल्या आत्याशी बोलली. आत्याच्या शब्दांना घरात कोणीही टाळत नाही हे तिला ठाऊक होते. रशीदाने आणखी एक मार्ग शोधला, ती शाळेतून परत येताच घरकाम पटापट उरकून घ्यायची आणि मग रात्री उशीरापर्यंत अभ्यास करायची. २१ व्या वर्षी रशीदाचे लग्न झाले. ती ज्या शाळेत शिकली त्याच शाळेत शिक्षिका आहे. लोक तिला खूप मान देतात.



## निश्चयात्मक व्यवहार करणारे लोक

- ते प्रामाणिकपणाने आपल्या भावना प्रकट करतात.
- त्यांना जे हवे त्यासाठी ते सार्थक प्रयत्न करतात.
- ते इतरांना जाणूनबुजून त्रास देत नाहीत.
- ते इतरांनाही आपले उद्‌देश पूर्ण करण्याची मुभा देतात.
- ते स्वतःचा आणि इतरांचाही आदर करतात.
- जे स्वतःला आवडत नाही ते दुसऱ्यासाठीही ते पसंत करत नाहीत.

ते विचार करतात की, 'मी ठिक आहे तुम्ही पण ठिक आहात.'



## दृढनिश्चयाने आपल्या भावना कशा प्रकट कराव्यात

- तुम्हाला काय वाटते, ते स्पष्टपणे सांगा.
- जेव्हा तुम्ही कुठल्या विषयावर मत मांडणार असाल तर ते तर्कपूर्ण असेल याची काळजी घ्या.
- आपल्या गरजांबद्दल स्पष्टपणे बोला आणि इतरांच्या भावनांचाही मान ठेवा.

